


# मराठी वाचनपाठ

BASED ON NEW PAPER PATTERN OF MAHARASHTRA STATE BOARD

## STD. X

(ENG. MED.)

सौ. अनिता म्हात्रे
M.A. B.Ed.

अनुजा मेस्त्री
B.A., PGD Jour. & Mass Comm.

प्राची शेंडे
M.Com., C.A.

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित नवीन परीक्षापद्धतीवर आधारित.

# मराठी वाचनपाठ

## इयत्ता दहावी

First Edition: February 2016

**ठळक वैशिष्ट्ये:**

- नवीन परीक्षापद्धतीवर आधारित.
- सोपी भाषा, सहज लेखनशैली व सुटसुटीत मांडणी.
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती.
- सर्व अभ्यासघटकांच्या सखोल अभ्यासासाठी वैविध्यपूर्ण कृती.
- सरावासाठी नमुना कृतिपत्रिका.
- स्वयंमूल्यमापनासाठी उपयुक्त.

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 11203

10192_10350_JUP

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो! दहावीचं वर्ष म्हणजे भरपूर अभ्यास, परीक्षेचा प्रचंड ताण. नवीन अभ्यासपद्धतीमुळे तुमच्या मनात नानाविध प्रश्न निर्माण होत असतील. पण मुलांनो, मुळीच काळजी करू नका. तुमच्या मनातील प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व तुमची या नवीन अभ्यासपद्धतीशी ओळख करून देण्यासाठीच टार्गेट प्रकाशनाचे 'मराठी वाचनपाठ इयत्ता दहावी' हे पुस्तक प्रकाशित करत आहोत.

पूर्वीच्या अभ्यासपद्धतीचा बाज मोडून शिक्षण विभागाने नवीन अभ्यासपद्धती अंगिकारली आहे, जेणेकरून भाषाज्ञान हे प्रश्नोत्तरांपुरते मर्यादित न राहता मुलांचे ज्ञान, आकलन, उपयोजन व त्यांच्या उच्च बोधात्मक क्षमतांचा विकास होईल. नवीन अभ्यासपद्धतीमुळे मुलांना स्वत:च्या शब्दांत उत्तरे लिहावी लागणार असल्याने त्यांच्या अभिव्यक्ती क्षमतेचा कस लागणार आहे.

मुलांनो, नवीन अभ्यासपद्धती खरेतर फार मजेशीर व उपयुक्त आहे. या पद्धतीमुळे पूर्वीच्या 'घोका व ओका' या पाठांतराच्या पद्धतीला मूठमाती मिळणार आहे. प्रश्नांची उत्तरे पाठ करण्याची आता गरज उरलेली नाही. ही नवीन अभ्यासपद्धती, तुम्हाला पाठाचे आकलन किती झाले आहे व ते मांडताना तुमची अभिव्यक्ती कशी आहे हे जोखणारी आहे. त्यामुळे तुमच्या आकलनशक्तीला, विचारक्षमतेला, कृतिशीलतेला, सृजनशीलतेला व कल्पकतेला भरपूर वाव मिळेल. या पद्धतीमुळे भाषेबद्दलची अभिरुची वाढण्यास मदत होईल. नवीन अभ्यासपद्धतीनुसार अभ्यास करताना तुम्हाला प्रत्येक शब्द काळजीपूर्वक अभ्यासायचा आहे, जेणेकरून शब्दांच्या अर्थाचे अनेक पैलू तुम्हाला उमगतील व तुमची भाषा शब्दसंपन्न होईल.

शिक्षण विभागाच्या नवीन अभ्यासपद्धतीचे बारकाईने विश्लेषण करून हे पुस्तक विकसित केले आहे. नवीन अभ्यासपद्धती अवलंबताना अभ्यासक्रमातील प्रत्येक प्रकरणावर व प्रकरणातील प्रत्येक घटकावर अनेक प्रकारच्या कृती समाविष्ट केल्या आहेत. त्यामध्ये आकृतिबंध, वेब जाल, ओघतक्ते अशा वैविध्यपूर्ण कृतींचा समावेश केला आहे. जेणेकरून हे नवीन तंत्र तुम्हाला सरावाने आत्मसात करता येईल व स्वत:चे मूल्यमापन करण्यास उपयुक्त ठरेल. सोपी भाषा, सहज लेखनशैली आणि आत्मसात करण्यास प्रभावी अशी सुटसुटीत मांडणी यांमुळे हे पुस्तक तुमच्या पसंतीस उतरेल याची आम्हाला खात्री वाटते.

तुमचे ध्येय ठरवा, ते गाठण्यासाठी नियोजन करा. नियमितपणे वाचन करा, त्यावर विचार करा व नवीन अभ्यासपद्धतीला आत्मविश्वासाने सामोरे जा. मग निश्चित ध्येय गाठणे मुळीच कठीण होणार नाही. प्रयत्न हीच यशाची गुरूकिल्ली आहे. तुमच्या प्रयत्नांत आमची नेहमीच सोबत आहे.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत.

**धन्यवाद!**

**परीक्षेसाठी मन:पूर्वक शुभेच्छा !**

**प्रकाशक**

---

# कृतिपत्रिका आराखडा (गुणविभागणीसह)

**वेळ: ३ तास** | **एकूण गुण: ८०**

**विभाग १ : गद्य** | **एकूण गुण २०**

| | | | |
|---|---|---|---|
| **कृ.१. (अ)** | **गद्य उतारा (पठित) (१२० ते १५० शब्द)** | | |
| | (अ - १) | आकलन कृती | २ |
| | (अ - २) | आकलन कृती | २ |
| | (अ - ३) | व्याकरणाधारित कृती | २ |
| | (अ - ४) | अभिव्यक्ती / स्वमत प्रकटन | २ |
| | | | **८ गुण** |
| **कृ.१. (ब)** | **गद्य उतारा (पठित) (१२० ते १५० शब्द)** | | |
| | (ब - १) | आकलन कृती | २ |
| | (ब - २) | आकलन कृती | २ |
| | (ब - ३) | व्याकरणाधारित कृती | २ |
| | (ब - ४) | अभिव्यक्ती / स्वमत प्रकटन | २ |
| | | | **८ गुण** |

| | | | |
|---|---|---|---|
| **कृ.१ (क)** | **गद्य उतारा (पठित) (५० ते ६० शब्द)** | | |
| | (क - १) | आकलन कृती | २ |
| | (क - २) | आकलन कृती | २ |
| | | | **४ गुण** |
| | **किंवा** | | |
| | **कोणत्याही एका गद्य पाठावर आधारित सारांशलेखन** | | **४ गुण** |

**विभाग २ : पद्य** **एकूण गुण १६**

| | | | |
|---|---|---|---|
| **कृ.२. (अ)** | **कविता (पठित)** | | |
| | (अ - १) | आकलन कृती | २ |
| | (अ - २) | आकलन कृती | २ |
| | (अ - ३) | संदर्भ, प्रस्तावनाधारित कृती | २ |
| | (अ - ४) | भावार्थाधारित कृती (स्वमत) | २ |
| | | | **८ गुण** |
| **कृ.२. (ब)** | **कविता (पठित)** | | |
| | (ब - १) | आकलन कृती | २ |
| | (ब - २) | आकलन कृती | २ |
| | (ब - ३) | संदर्भ, प्रस्तावनाधारित कृती | २ |
| | (ब - ४) | भावार्थाधारित कृती (स्वमत) | २ |
| | | | **८ गुण** |

**विभाग ३ : स्थूलवाचन** **एकूण गुण ४**

| | | |
|---|---|---|
| **कृ.३. कृती १ :** | स्थूलवाचनाच्या पाठांवर आधारित आकलन / उपयोजन / अभिव्यक्ती / कल्पनाशक्ती यांवर प्रत्येकी २ गुणांच्या २ कृती | २ |
| **कृती २ :** | | २ |
| | | **४ गुण** |

**विभाग ४ : व्याकरण** **एकूण गुण १०**

| | | |
|---|---|---|
| **कृ.४.** (अ) | सामान्यनाम कृती | २ |
| (ब) | वचन कृती | २ |
| (क) | शब्दसंपत्ती कृती | २ |
| (ड) | लेखननियमांनुसार लेखन कृती | २ |
| (ई) | वाक्प्रचार कृती | २ |
| | | **१० गुण** |

**विभाग ५ : उपयोजित लेखन** **एकूण गुण ३०**

| | | |
|---|---|---|
| **कृ.५.** (अ) | पत्रलेखन (२ पैकी १) | ५ |
| (ब) | अपठित गद्य उतारा (उताऱ्यावर ५ प्रश्न तयार करणे) | ५ |
| (क) | कथालेखन (कथापूर्ती / शब्दांवरून कथालेखन / मुद्यांवरून कथालेखन) | ५ |
| (ड) | लेखनप्रकार (४ पैकी ३) **(प्रत्येकी ५ गुण)** | १५ |

(१) प्रसंगावरून लेखन (२) संवादलेखन (३) चित्रवर्णन
(४) बातमी / वृत्तान्तलेखन (५) जाहिरातलेखन (६) आत्मकथन
(७) भ्रमणध्वनीसाठी संदेश

**३० गुण**

या ७ लेखनप्रकारांपैकी कोणतेही ४ लेखनप्रकार विचारले जातील आणि त्यांपैकी कोणतेही ३ लेखनप्रकार विद्यार्थ्यांना सोडवायला सांगितले जातील.

## घटकनिहाय गुणविभागणी

| अनु. क्र | विभाग | गुण |
|---|---|---|
| १ | गद्य | २० |
| २ | पद्य | १६ |
| ३ | स्थूलवाचन | ०४ |
| ४ | व्याकरण | १० |
| ५ | उपयोजित लेखन | ३० |
| | | ८० |

**टीप : मराठी – द्वितीय भाषा (वाचनपाठ) ९ वी च्या नवीन कृतिपत्रिकेच्या आराखड्यावर आधारित**

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **गद्य विभाग** | | |
| १ | संवाद, विसंवाद | शांता शेळके | १ |
| २ | शाश्वत शिक्षणसंपत्ती | चंद्रशेखर धर्माधिकारी | १३ |
| ३ | अपूर्व भेट | रणजित देसाई | २५ |
| ४ | मास्तर आणि मी | कृष्णाबाई सुर्वे | ३८ |
| ५ | हिमालय | प्रभाकर पेंढारकर | ५० |
| ६ | परिवर्तनाचे उत्सव | विद्या बाळ | ५९ |
| ७ | वारूळ | अनिल अवचट | ७१ |
| ८ | उरुसाचे दिवस | आशा आपराद | ८० |
| ९ | माणुसकीचा झरा | चित्रलेखा पुरंदरे | ९७ |
| १० | निसर्गवेध | बी. जी. वाघ | १०६ |
| ११ | बाबूजी | संजय गिरासे | १२१ |
| १२ | काय राव पुस्तकराव ! | दासू वैद्य | १३९ |
| | **पद्य विभाग** | | |
| १ | संतवाणी | | |
| अ | आजि सोनियाचा दिवस | संत सेना महाराज | १५३ |
| आ | कृपा करी पंढरीनाथा | संत नरहरी सोनार | १५६ |
| इ | किती हे सुख | संत सोयराबाई | १५९ |
| २ | जिथे राबती हात | ग. दि. माडगूळकर | १६३ |
| ३ | माझ्या घरट्यात | सूर्यकांत खांडेकर | १६७ |
| ४ | प्रलय | रोहिदास पोटे | १७१ |
| ५ | गाव | अनिल पाटील | १७५ |
| ६ | आपण धरणी गं | ऋषीकेश कांबळे | १७९ |
| ७ | एकत्वाचे गीत महान | आश्लेषा महाजन | १८३ |

| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **स्थूलवाचन** | | |
| १ | नातवंडांस पत्र | मृणालिनी साराभाई | १८७ |
| २ | प्रतिसरकार | नागनाथअण्णा नायकवडी | १९० |
| ३ | गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व | आनंद यादव | १९५ |
| ४ | मुलांचे स्वप्न | सोनाली नवांगुळ | १९९ |
| | **व्याकरण** | | |
| १ | समास | | २०३ |
| २ | वाक्यरूपांतर | | २०७ |
| ३ | वाक्प्रचार | | २१० |
| ४ | विभक्ती | | २१३ |
| ५ | शब्दांच्या जाती | | २१५ |
| | **उपयोजित लेखन** | | |
| १ | निबंधलेखन | | २१८ |
| २ | कथालेखन | | २३१ |
| ३ | गद्य आकलन | | २३५ |
| ४ | जाहिरात | | २३८ |
| ५ | वृत्तान्तलेखन | | २४६ |
| ६ | पत्रलेखन | | २४९ |
| ७ | संवाद लेखन | | २६० |
| ८ | भ्रमणध्वनी संदेशलेखन | | २६३ |
| | **परिशिष्टे** | | |
| | तोंडी परीक्षेविषयी महत्त्वाची माहिती | | २६४ |
| | नमुना कृतिपत्रिका – १ | | २६८ |
| | नमुना कृतिपत्रिका – २ | | २७७ |

# ०१ संवाद, विसंवाद

-- लेखिका - शांता शेळके (मदरंगी)

## लेखिका परिचय

शांता जनार्दन शेळके (१९२२ – २००२)

मराठीतल्या सुप्रसिद्ध कवयित्री व गीतकार शांता शेळके यांनी आपल्या विविध काव्य व लेखनाच्या माध्यमातून साहित्यसृष्टीस मोलाचे योगदान दिले आहे. आळंदी येथे १९९६ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

## लेखिकेचे साहित्यलेखन

**कवितासंग्रह** – 'वर्षा', 'रूपसी', 'गोंदण', 'जन्मजान्हवी' इ.

**आत्मचरित्रात्मक लेखांचे संकलन** – 'धूळपाटी'.

**ललितगद्यसंग्रह** – 'शब्दांच्या दुनियेत', 'पावसाआधीचा पाऊस', 'संस्मरणे', 'मदरंगी' इ.

## पाठाची पार्श्वभूमी

प्रस्तुत पाठ हा 'मदरंगी' या ललितगद्यसंग्रहातून घेतलेला आहे. या पाठात शांता शेळके यांनी संवादाच्या विविध प्रकारांचे व त्यांतील अडथळ्यांचे ओघवत्या शैलीत वर्णन केले आहे.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| **अकारण** | उगीचच (for no reason) |
| **अध्यात्मक्षेत्र** | (the field of metaphysics) |
| **अनंत-असंख्य** | अगणित (unlimited, endless) |
| **अवाक्षर** | एकही अक्षर (a singal word) |
| **आग्रह** | हट्ट (importunity) |
| **आदर्शावस्था** | आदर्श स्थिती (ideal condition) |
| **उत्कट** | तीव्र जोरदार (extreme) |
| **उपद्रव** | त्रास (harrasse, trouble) |
| **औपचारिक** | केवळ शिष्टाचार (formal) |
| **गैरसमज** | चुकीचा समज (misunderstanding) |
| **गोंडस** | गोजिरे, सुरेख (cute, lovely) |
| **चढाओढ** | स्पर्धा (competition) |
| **चमत्कारिक** | विचित्र (strange) |
| **चुळबुळत** | एका जागी शांत न बसणे (unsteady) |
| **जिवलग** | जिवाभावाची (very close) |
| **जुजबी** | तात्पुरते (temporary) |
| **जोडपी** | युगुले (couples) |
| **ठणठणीत बोलणे** | स्पष्ट बोलणे, मोकळेपणाने बोलणे (speak clearly) |
| **दारिद्र्य** | गरिबी (poverty) |
| **दुराग्रह** | चुकीचा आग्रह, हटवादीपणा (unrealistic demand, obstinacy) |
| **दुरावा** | अंतर (distance) |
| **धाडस** | हिंमत, धैर्य (courage) |
| **ध्यास** | तीव्र ओढ (a great longing) |
| **ध्येय** | उद्दिष्ट, लक्ष्य (aim, goal ) |
| **नि:शब्द** | शब्दांशिवाय (speechless) |
| **परमोच्च** | अतिशय उच्च दर्जाचे (of a very high quality) |
| **परी** | तऱ्हा, प्रकार (types) |
| **प्रकृती** | स्वभाव, वृत्ती (nature) |
| **बिकट** | कठीण (tough, difficult) |
| **बिनतारी यंत्र** | तार नसलेले यंत्र (wireless) |
| **भरमसाट** | खूप जास्त (excessive) |
| **भावणे** | आवडणे (like) |
| **भोक्ते** | चाहते (followers, fans) |
| **मर्जी** | प्रेम (mood) |
| **मनसोक्त** | मनमुराद, स्वच्छंद (to one's heart's content) |
| **मुकाट** | गप्प (mutely) |
| **मुखोद्गत** | तोंडपाठ (by heart) |
| **यजमान** | कुटुंबप्रमुख, घरमालक (host) |
| **वक्र** | वाकडे (crooked) |
| **वावगे** | चुकीचे (wrong) |
| **विद्वान** | बुद्धिमान (scholar) |
| **विधान** | (Statement) |
| **विनासायास** | काहीही प्रयत्न न करता (without any efforts) |
| **वृत्ती** | स्वभाव (attitude, nature) |
| **शिताफीने** | कौशल्यपूर्वक (skillfully) |
| **संवाद** | बोलणे (communication) |
| **सुसंस्कृत** | (cultured) |
| **स्वाभिमान** | स्वत:विषयीचा अभिमान (self-esteem) |
| **हुद्दा** | पद (designation) |

| | |
|---|---|
| **हृद्य** | हृदयास स्पर्श करणारे (touching to one's heart) |
| **क्षुल्लक** | विशेष महत्त्व नसलेले (unimportant, negligible) |

## टिपा

| | |
|---|---|
| **डिकन्स, पी. जी. वुडहाऊस, हार्डी** | प्रख्यात इंग्रजी साहित्यिक. |
| **यशवंत** | स्वातंत्र्यपूर्व काळातील एक प्रमुख मराठी कवी. 'रविकिरण मंडळ' या कविमंडळाचे महत्त्वाचे सदस्य. |
| **रविकिरण मंडळ** | सन १९२२ साली पुण्यात माधव जूलियन, गिरीश, यशवंत आणि अन्य काही कवींनी एकत्र येऊन स्थापन केलेले कविमंडळ. |
| **शब्देंविण संवादिजे** | ज्ञानेश्वरीतील एका ओवीतील वाक्यखंड. |

## पाठातील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| **अढी राहणे** | मनात राग ठेवणे. (grudge) |
| **आर्जव करणे** | विनंती करणे. (to request) |
| **आनंद मनसोक्त लुटणे** | मनापासून आनंद घेणे. (to enjoy thouroughly) |
| **गर्क होणे** | गढून जाणे, तल्लीन होणे. (be immersed in) |
| **चुटपुट वाटणे** | हुरहूर वाटणे. (to be anxious) |
| **दुरावा राखणे** | दूर राहणे. |
| **ध्यास घेणे** | एखाद्या गोष्टीच्या परिपूर्णतेसाठी सतत प्रयत्न करणे. (to decide fiercely) |
| **भरभरून बोलणे** | खूप बोलणे. (talking constantly) |
| **मर्जी जाणे** | राग येणे. (be a little upset) |
| **मन दुखावले जाणे** | मनास वाईट वाटणे. (to hurt sentiments) |
| **मनाला उमगणे** | समजून जाणे. (to understand without saying) |
| **मुकाट बसून राहणे** | जबरदस्तीने शांत बसावयास लागणे. (to sit quitely) |
| **विपर्यास करणे** | बोलण्याचा वेगळा अर्थ काढणे. (misunderstanding) |
| **सूर जुळणे** | मनातले विचार पटणे. (to understand each other) |
| **स्तंभित होणे** | आश्चर्यचकित होणे. (surprised) |
| **हर्षभरित होणे** | अतिशय आनंद होणे. (to get delighted) |
| **क्षमा मागणे** | माफी मागणे. (to say sorry) |

## पाठातील म्हण

**'व्यक्ती तितक्या प्रकृती'** – निरनिराळी माणसे निरनिराळ्या स्वभावाची असतात.


## स्वाध्याय

### परिच्छेद १

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १ वरील (ओळ १ ते १५) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[दोन विद्वान माणसांची गोष्ट ..................... ..................... ठणठणीत बोलणेच हवे असते.]**


**अ. आकलन**

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**




**उत्तर:** १. दोघांची भेट झाली.
२. दोघेही खुर्च्यांवर शांत बसून राहिले.
३. एकमेकांशी अवाक्षर बोलले नाहीत.
४. तासाभराने भेटीला आलेला विद्वान उठला.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. दोन जिवलग.
२. अध्यात्म क्षेत्रातील गुरुशिष्य.
३. एकाच ध्येयाचा व कलेचा ध्यास घेतलेले उत्कट साधक.

**कृ.३. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. पण बोलणे आणि _______ बोलणेच हवे असते.
(ठणठणीत / दणदणीत / खणखणीत / फणफणीत)

२. इथे मनाचेच एक बिनतारी _______ चालू असते.
(होकायंत्र / तारायंत्र / मनयंत्र / लोहयंत्र)

**उत्तर:** १. ठणठणीत २. तारायंत्र

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. शब्दांचे माध्यम तिथे अपुरे पडते असे नव्हे, तर ________ .

अ. बोलण्याची गरजही उरलेली नसते.

ब. बोलण्याची गरजही उरलेली असते.

क. शब्दांची गरजही तिथे उरलेली असते.

ड. शब्दांची तिथे गरजही उरलेली नसते.

२. आपल्यासारख्या सामान्यांना ________

अ. शब्दांवाचूनचे संवाद भावणारही नाहीत.

ब. बोलण्यावाचून काही कळणार नाही.

क. लिहिल्यावाचून काही कळणार नाही.

ड. रागावल्याशिवाय काही कळणार नाही.

**उत्तर:** १. शब्दांचे माध्यम तिथे अपुरे पडते असे नव्हे, तर **शब्दांची तिथे गरजही उरलेली नसते.**

२. आपल्यासारख्या सामान्यांना **शब्दांवाचूनचे संवाद भावणारही नाहीत.**

**कृ.५. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१. संवाद या संकल्पनेची परमोच्च आदर्शावस्था कोणती?**

**उत्तर:** एक तासभर शब्दही न बोलता संवादाचा आनंद मनसोक्त लुटणारे विद्वान म्हणजे संवाद संकल्पनेची परमोच्च आदर्शावस्था आहे.

**२. आपल्याला कोणत्या प्रकारचे बोलणे हवे असते?**

**उत्तर:** आपल्याला कठीण, साधे, सरळ, वक्र, कसे का होईना, पण बोलणे आणि ठणठणीत बोलणेच हवे असते.

**कृ.६. "शब्दांचे माध्यम तिथे अपुरे पडते असे नव्हे, तर शब्दांची गरजच उरलेली नसते" असे लेखिका का म्हणते?**

**उत्तर:** लेखिकेच्या मते दोन जिवलग, अध्यात्मक्षेत्रातील गुरुशिष्य, एकाच ध्येयाचा किंवा कलेचा ध्यास घेतलेले उत्कट साधक शब्दांशिवाय संवाद साधू शकतात. अनेक वर्षे एकत्र संसार केलेली काही वृद्ध जोडपी बघितली की लक्षात येते, की ती एकमेकांशी बोलताना सहसा आढळत नाहीत; पण एकमेकांशी शब्दांविना संवाद ते साधू शकतात. वर्षानुवर्षे एकमेकांच्या सहवासात राहून त्यांची मने पूर्णत: जुळलेली असतात. त्यामुळे, एकाने घेतलेला निर्णय त्याने न बोलताच दुसऱ्याच्या मनाला आधीच कळतो व तो त्याला मान्यही झालेला असतो. दोन व्यक्तींची मने जुळली, की त्यांच्यातील संवादासाठी शब्दांची गरजच उरत नाही, अशा वेळेस शब्दांचे माध्यम अपुरे पडते असे नव्हे, तर मनाची एवढी एकरूपता असते की शब्दांच्या माध्यमाची तिथे गरजच उरत नाही असे लेखिकेला वाटते.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. ध्येय : उद्दिष्ट :: ज्ञानी : ☐

२. अपुरे : पुरे :: संवाद : ☐

**उत्तर:** १. विद्वान २. विसंवाद

**कृ.२. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. आनंद, हर्षभरित, मनसोक्त, प्रत्यय.

२. शब्द, संसार, संवाद, अवाक्षर.

**उत्तर:** १. प्रत्यय २. संसार

**कृ.३. शब्दसमूहाला एक शब्द द्या.**

तार नसलेले यंत्र

**उत्तर:** बिनतारी यंत्र

**कृ.४. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१. **आनंद मनसोक्त लुटणे :** मनापासून आनंद घेणे.

**वाक्य:** पं. हरिप्रसाद चौरसियांच्या बासरीवादनाच्या कार्यक्रमात श्रोते संगीताचा **आनंद मनसोक्त लुटत होते.**

२. **हर्षभरित होणे :** खूप आनंद होणे.

**वाक्य:** वार्षिक परीक्षेत पहिला नंबर आल्याने नावेद **हर्षभरित** झाला.

**कृ.५. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

**परवडणारही**

१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९

**उत्तर:** वड, वर, परवड, पर, पड, रव, रड, वही, हीर

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील वाक्यातील नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद ओळखून त्यांचे योग्य वर्गीकरण करा.**

दोन विद्वान माणसांची गोष्ट सांगतात.

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| माणसे, गोष्ट | – | दोन, विद्वान | सांगतात |

**कृ.२. वाक्यातील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

१. आपापल्या जागी खुर्च्यांवर शांतपणे बसून राहिले.

**उत्तर:** वर – शब्दयोगी अव्यय

पणे – शब्दयोगी अव्यय

२. वा वा! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू.

**उत्तर:** वा वा! – केवलप्रयोगी अव्यय

किती – क्रियाविशेषण अव्यय

म्हणून – उभयान्वयी अव्यय

**कृ.३. खाली एका सामासिक शब्दाचा विग्रह करून देण्यात आलेला आहे. तसाच दुसरा सामासिक शब्द उताऱ्यातून शोधा व त्याचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.**

आईबाप – आई आणि बाप

**उत्तर:**

| शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| गुरुशिष्य | गुरू आणि शिष्य | इतरेतर द्वंद्व समास |

**कृ.४. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. प्रापंचिक / प्रापंचीक / प्रपंचिक / प्रपंचीक

२. मिळूनजूळून / मिळूनजुळून / मिळुनजुळुन / मिळूनजूळुन

१. प्रापंचिक २. मिळूनजुळून

**कृ.५. लेखननियमांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.**

१. सामान्यांना शब्दावाचुनचे संवाद भावणारहि नाहीत.

**उत्तर:** सामान्यांना **शब्दावाचूनचे** संवाद **भावणारही** नाहीत.

२. किती मजेत वेळ गेला म्हणुन सांगु!

**उत्तर:** किती मजेत वेळ गेला **म्हणून सांगू**!

**कृ.६. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. वा वा! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू ! **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** वेळ खूप मजेत गेला.

२. इथे मनाचे बिनतारी यंत्र चालू असते. **(आज्ञार्थी करा.)**

**उत्तर:** इथे मनाचे बिनतारी यंत्र चालू ठेवा.

**कृ.७. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | माणसांची | – | – | – |
| २. | भेटीला | – | – | – |
| ३. | तासाभराने | – | – | – |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | माणसांची | माणसां | ची | षष्ठी |
| २. | भेटीला | भेटी | ला | द्वितीया/चतुर्थी |
| ३. | तासाभराने | तासाभरा | ने | तृतीया |

**ड. माझे मत**

**कृ.१. आपल्या आजूबाजूच्या लोकांशी संवाद साधण्यासाठी तुम्ही कोणती साधने किंवा माध्यमे वापरता?**

**उत्तर:** संवाद हा दोन व्यक्तींना एकमेकांशी जोडणारा दुवा असतो. हा संवाद साधण्यासाठी मी प्रत्यक्ष बोलणे, स्मार्टफोन, ई-मेल, लघुसंदेश इत्यादी साधनांचा वापर करतो. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे या साधनांनी संवाद अतिशय जलद व सोपा झाला आहे. असे असले तरी प्रत्यक्ष बोलून संवाद साधणे मला जास्त आवडते. यामुळे कोणतेही गैरसमज होत नाहीत आणि आपल्याला जे सांगायचे आहे ते आपण व्यवस्थित पोहोचवू शकतो. आपल्या चेहऱ्यावरील भाव समोरच्याला दिसत असल्यामुळे तोही आपले बोलणे अधिक सहजतेने समजू शकतो. विशेषत: आईवडिलांशी किंवा इतर जवळच्या व्यक्तींशी प्रत्यक्ष संवाद अतिशय सोयीस्कर असतो. यामुळे गैरसमजांना थारा तर उरत नाहीच आणि जवळच्या व्यक्तींशी असलेले बंध अधिक दृढ होतात.

## परिच्छेद २


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १,२ वरील (ओळ १६ ते ३२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[आणि या बोलण्याचे ......................**

**...................... मनात अढी राहून गेली ती गेलीच.]**

**अ. आकलन**

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. एकमेकांचे अनेक गुणदोष माहीत असणे.


२. एकमेकांच्या जीवनातले माहीत असलेले बरेवाईट तपशील टाळणे.

३. नात्यांच्या जवळिकीमुळे येणारे अवघडलेपण.

४. मन दुखावणार नाही याची काळजी घेणे.


५. मतभेदाचे विषय टाळणे.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. नाव  २. गाव
३. व्यवसाय  ४. हुद्दा
५. पत्ता

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. मुक्त  २. मोकळे

**कृ.४. ओघतक्ता पूर्ण करा.**




**उत्तर:** १. जेवणाचे बिल प्रमाणापेक्षा अधिक झाले.
२. बिलाबद्दलची लेखिकेची भूमिका बघून मैत्रीण नाराज झाली.

**कृ.५. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. नात्यातल्या जवळिकीमुळेच कधीकधी एक ________ अवघडलेपणही अनुभवाला येते.
(भयंकर / चमत्कारिक / गंमतशीर / विचित्र)

२. सध्या माझी परिस्थिती जरा ________ आहे हे खरं.
(बिकट / तिखट / चांगली / वाईट)

**उत्तर:** १. चमत्कारिक  २. बिकट

**कृ.६. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. गैरसमज तर असे आणि इतक्या कारणांमुळेच होतात, की ________
अ. ते कसे वाढवावेत हे समजत नाही.
ब. ते कसे कमी करावेत ते समजत नाही.
क. ते कसे टाळावेत हे समजतच नाही.
ड. हे सगळं समजण्यापलीकडे आहे.

२. मी फक्त इतकंच म्हणत होतो की, ________
अ. अशा जेवणाला इतके बिल आकारणे योग्य नाही.
ब. अशा नाश्त्याला इतके बिल आकारणे योग्य नाही.
क. अशा माणसाला महत्त्व देणे योग्य नाही.
ड. अशा व्यक्तीला महत्त्व देणे योग्य नाही.

**उत्तर:** १. गैरसमज तर असे आणि इतक्या कारणांमुळेच होतात, की **ते कसे टाळावेत हे समजतच नाही.**
२. मी फक्त इतकंच म्हणत होतो की, **अशा जेवणाला इतके बिल आकारणे योग्य नाही.**

**कृ.७. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१. प्रस्तुत उताऱ्यात कोणती म्हण आली आहे?**

**उत्तर:** प्रस्तुत उताऱ्यात 'व्यक्ती तितक्या प्रकृती' ही म्हण आली आहे.

**२. मित्रांशी बोलतांना आपण कोणते विषय टाळतो?**

**उत्तर:** मित्रांशी बोलतांना आपण मतभेदाचे अवघड विषय शिताफीने टाळतो.

**कृ.८. मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद, मोकळा संवाद असू शकत नाही, असे लेखिकेला का वाटते?**

**उत्तर:** संवाद साधताना व्यक्तिपरत्वे तो बदलू शकतो. आपल्या अगदी जवळच्या माणसाशी बोलताना आपण मोकळेपणाने बोलतो असे आपल्याला वाटते; परंतु अशा मोकळ्या संवादावर बंधने पडत असतात. मैत्रीत एकमेकांचे गुणदोष, जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात. नात्यातल्या या जवळिकीमुळेच कधीकधी एक चमत्कारिक अवघडलेपणही अनुभवाला येते. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही, याची सतत काळजी घ्यावी लागते. अगदी क्षुल्लक कारणांवरूनही गैरसमज होतात. प्रत्येक वेळी बोलताना मतभेदाचे अवघड विषय जाणीवपूर्वक टाळून बोलावे लागतात. यामुळे संवादात अडथळे येतात.

म्हणूनच मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा मोकळा संवाद असू शकत नाही, असे लेखिकेला वाटते.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांना उताऱ्यातील पर्यायी शब्द शोधा.**

१. कठीण : ☐
२. भावनिक : ☐
३. विचित्र : ☐

**उत्तर:** १. बिकट २. हळव्या
३. चमत्कारिक

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द सांगा.**

१. जवळीक × ☐
२. दुखावणे × ☐

**उत्तर:** १. दुरावा २. सुखावणे

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. गप्पा, संवाद, बोलणे, बिल
२. व्यक्ती, माणसे, प्रकृती, मैत्रीण

**उत्तर:** १. बिल २. प्रकृती

**कृ.४. शब्दसमूहाबद्दल एक शब्द सांगा**

१. स्वत:बद्दल असलेला अभिमान : ☐
२. एखाद्या गोष्टीचा काढलेला चुकीचा अर्थ : ☐

**उत्तर:** १. स्वाभिमान २. विपर्यास

**कृ.५. वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | वाक्प्रचार | | अर्थ |
|---|---|---|---|
| १. | स्तंभित होणे | अ. | राग येणे |
| २. | अढी राहणे | ब. | आश्चर्यचकित होणे |
| ३. | मर्जी जाणे | क. | विनंती करणे |
| ४. | विपर्यास करणे | ड. | मनात राग ठेवणे |
| ५. | आर्जव करणे | इ. | मनास वाईट वाटणे |
| ६. | मन दुखावले जाणे | फ. | बोलण्याचा वेगळा अर्थ काढणे |

**उत्तर:** (१ - ब), (२ - ड), (३ - अ), (४ - फ), (५ - क), (६ - इ)

**कृ.६. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

**अवघडलेपणाही**

↓ १ | २ | ३ | ४ | ५ | ६

**उत्तर:** अवघड, घड, घडले, वड, वही, लेप

**कृ.७. खालील शब्दातील अक्षरांपासून तयार होणाऱ्या शब्दांतील चुकीचा शब्द ओळखा.**

**जवळिकीमुळेच**

↓ चव | कीव | मुळे | जळे | मुकी | जवळ

**उत्तर:** जवळ

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्द आणि त्यांच्या जाती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | जाती |
|---|---|---|---|
| १. | मी | अ. | क्रियापद |
| २. | म्हणाली | ब. | विशेषण |
| ३. | विधान | क. | सर्वनाम |
| ४. | वाकडे | ड. | नाम |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ड), (४ - ब)

**कृ.२. खालील वाक्यातील अधोरेखित अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**

१. आपली समजूत असते पण ती खरी असते का?

**उत्तर:** पण – उभयान्वयी अव्यय

२. त्या चालीवर 'माणसे तितकी बोलणी' अशी म्हण बनवायला हरकत नाही.

**उत्तर:** वर – शब्दयोगी अव्यय

३. अगं! पैसे तू दिलेस काय, मी दिले काय सारखेच की.

**उत्तर:** अगं – केवलप्रयोगी अव्यय

**कृ.३. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | समाजात | | |
| २. | मित्रमंडळींशी | | |
| ३. | एकमेकांची | | |
| ४. | विधानाला | | |

**उत्तर:**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | समाजात | त | सप्तमी |
| २. | मित्रमंडळींशी | शी | तृतीया |
| ३. | एकमेकांची | ची | षष्ठी |
| ४. | विधानाला | ला | द्वितीया/ चतुर्थी |

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. मित्रमंडळी २. आग्रहदुराग्रह
३. बरेवाईट ४. गुणदोष

| | शब्द | विग्रह | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | मित्रमंडळी | मित्र, मंडळी वगैरे | समाहार द्वंद्व समास |
| २. | आग्रहदुराग्रह | आग्रह किंवा दुराग्रह | वैकल्पिक द्वंद्व समास |
| ३. | बरेवाईट | बरे किंवा वाईट | वैकल्पिक द्वंद्व समास |
| ४. | गुणदोष | गुण किंवा दोष | वैकल्पिक द्वंद्व समास |

**कृ.५. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. वीपर्यास २. गूनदोष

**उत्तर:** १. विपर्यास २. गुणदोष

**कृ.६. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

१. मी सहज म्हटले केवढे बिल केलंय.

**उत्तर:** मी सहज म्हटले, “केवढं बिल केलंय?”

२. अगं तू पैसे दिले काय न मी दिले काय सारखंच की

**उत्तर:** ‘अगं ! तू पैसे दिले काय, मी दिले काय सारखंच की.’

**कृ.७. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. केवढं बिल केलंय ! **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** बिल खूपच केलंय.

२. माझ्या बोलण्यात काहीच वावगे नव्हते **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** माझ्या बोलण्यात काय वावगे होते?

**ड. माझे मत**

**१. आपल्या मित्रमंडळींशी गैरसमज झाले, तर तुम्ही ते कसे दूर करता?**


**उत्तर:** एखाद्या व्यक्तीशी आपली कितीही घट्ट मैत्री असली, तरी बोलण्याच्या नादात काही वेळा गैरसमज होतात. ते होऊ नयेत म्हणून मी खूप काळजी घेतो आणि झालेच, तर मी त्याचा राग शांत होण्याची वाट बघतो. तो शांत झाला, की मग मला काय म्हणायचे होते आणि त्याचा नेमका काय अर्थ निघाला याबद्दल सांगतो. आपल्याकडून चूक झाली असल्यास मी माफीदेखील मागतो. कधीकधी गैरसमज टोकाचे होतात. ते दूर करायला वेळ लागतो. मात्र मी ते दूर केल्याशिवाय राहत नाही; कारण या गैरसमजुतीपेक्षा आपली मैत्री कायमच श्रेष्ठ असते असे मला वाटते आणि ती जपण्यासाठी मी कायम प्रयत्नशील असतो.

## परिच्छेद ३

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २ वरील (ओळ ३३ ते ४९) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[पण अगदी साधे, सरळ ..................... ..................... मन खरोखरच चुटपुटले.]**


**अ. आकलन**

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. आगगाडीतील प्रवासी.
२. परदेशात तात्पुरती भेट झालेल्या व्यक्ती.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. कमी ओळख.
२. व्यक्तीविषयक संदर्भाचे ज्ञान अपुरे.
३. ती व्यक्ती नंतर भेटणार नसते.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. डिकन्स
२. पी. जी. वुडहाऊस
३. हार्डी

**कृ.४. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. माझ्या पोशाखावरून त्याने माझे ________ ओळखले असावे.
(नागरिकत्व/ भारतीयत्व/ विदेशत्व / पालकत्व)

२. जितके ________ संदर्भाचे, तपशिलाचे ज्ञान अपुरे, तितक्या गप्पा अधिक रंगतात.

(बाजारविषयक/ व्यक्तीविषयक/ समाजाविषयक/ आत्म्याविषयक)

**उत्तर:** १. भारतीयत्व २. व्यक्तीविषयक

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. परक्या माणसाजवळ आपण जेवढे मोकळे होतो, ________ .

अ. तेवढे भावंडांशी मोकळे होऊ शकत नाही.

ब. तेवढे आईवडिलांशी मोकळे होऊ शकत नाही.

क. तेवढे जवळच्या माणसापाशी होऊ शकत नाही.

ड. तेवढे मित्रमैत्रिणींशी देखील मोकळे होऊ शकत नाही.

२. आगगाडीतून प्रवास करताना ________.

अ. अशा खाण्याची चव साऱ्यांनीच कधी ना कधी चाखलेली असते.

ब. अशा माणसांची सवय साऱ्यांनीच ओळखलेली असते.

क. अशा गप्पांची गोडी साऱ्यांनीच कधी ना कधी चाखलेली असते.

ड. अशा व्यक्तींची चाचपणी सगळ्यांनीच केलेली असते.

**उत्तर:** १. परक्या माणसाजवळ आपण जेवढे मोकळे होतो, **तेवढे जवळच्या माणसापाशी होऊ शकत नाही.**

२. आगगाडीतून प्रवास करताना **अशा गप्पांची गोडी साऱ्यांनीच कधी ना कधी चाखलेली असते.**

**कृ.६. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१. अपरिचित व्यक्तींशी संवाद साधताना काय अनुभवायला मिळते?**

**उत्तर:** अपरिचित व्यक्तींशी संवाद साधताना एक वेगळेच सुंदर मोकळेपण अनुभवायला मिळते.

**२. इंग्रज लोक कसे असतात, असे लेखिकेने ऐकले होते?**

**उत्तर:** इंग्रज लोक अबोल, दुरावा राखणारे असतात असे लेखिकेने ऐकले होते.

**कृ.७. "जितकी ओळख कमी, तितका संवाद अधिक रंगतो" असे लेखिकेला का वाटते?**

**उत्तर:** अनोळखी व्यक्तीशी उदाहरणार्थ, आगगाडीतील सहप्रवाशांसोबत गप्पा करताना त्या व्यक्तीचे तपशील माहीत नसतात. त्याला देखील आपण कोण आहोत हे माहीत नसते. एकमेकांना फक्त नाव, गाव, व्यवसाय, हुद्दा विचारला जातो; पण ही ओळख जुजबी व तात्पुरती असते. पुन्हा भेटण्याची आशा किंवा भीती नसते. त्यामुळे माणसे भरभरून बोलतात. परक्या माणसाजवळ आपण जितके मोकळे होतो, तितके आपल्या माणसांजवळ होत नाही. कधीकधी दोन अनोळखी माणसांमध्ये दोघांनाही प्रिय असणारा विषय निघतो आणि मग दोघेही त्या विषयावर भरभरून बोलतात. त्यांची मने जुळतात, म्हणून जितकी ओळख कमी, तितका संवाद अधिक असे लेखकाला वाटते.

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. खालील शब्दांना उताऱ्यातील पर्यायी शब्द शोधा.**

१. त्रास : ☐

२. तात्पुरती : ☐

**उत्तर:** १. उपद्रव २. जुजबी

**कृ.२. खालील शब्दांना उताऱ्यातील विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. कटुता × ☐

२. असंस्कृत × ☐

**उत्तर:** १. गोडी २. सुसंस्कृत

**कृ.३. शब्दसमूहाला एक शब्द द्या.**

हृदयास स्पर्श करणारे : ☐

**उत्तर:** हृद्य

**कृ.४. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. परका, नाव, गाव, व्यवसाय

२. भारतीय, अमेरिकन, ब्रिटिश, परदेश

**उत्तर:** १. परका २. परदेश

**कृ.५. कंसात दिलेले वाक्प्रचार खाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**
**(चुटपुट वाटणे, सूर जुळणे, दुरावा राखणे)**

१. सुमेधशी भांडण झाल्यापासून त्याचा भाऊ सुबोधही माझ्यापासून दूर राहू लागला.

२. विज्ञान व तंत्रज्ञानाची आवड असल्यामुळे नेहा व स्नेहाला एकमेकींच्या मनातले विचार पटले.

३. सकाळी कामाच्या घाईत पाहुण्यांशी बोलता आले नाही म्हणून माझ्या मनाला हुरहूर लागली.

**उत्तर:** १. सुमेधशी भांडण झाल्यापासून त्याचा भाऊ सुबोधही माझ्यापासून **दुरावा राखू लागला.**

२. विज्ञान व तंत्रज्ञानाची आवड असल्यामुळे नेहा व स्नेहाचे **सूर जुळले.**

३. सकाळी कामाच्या घाईत पाहुण्यांशी बोलता आले नाही म्हणून मला **चुटपुट लागली.**

**कृ.६. खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. **माणसांजवळ**

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|

**उत्तर:** माळ, सांज, जवळ, मावळ, माज.

२. **परदेप्रवासात**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**उत्तर:** परदेश, देश, पर, वात, सात, वासा, शत, रत, तर, तवा, परत, प्रत.

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

**कृ.१. खालील वाक्यातील नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद ओळखून त्यांचे योग्य वर्गीकरण करा.**

१. मी काही फार प्रवास केलेला नाही.

२. माझ्या पोशाखावरून माझे भारतीयत्व त्याने ओळखले असावे.

| | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| १. | प्रवास | मी | फार | केलेला नाही |
| २. | भारतीयत्व पोशाख | माझ्या माझे त्याने | — | ओळखले असावे |

**कृ.२. खालील अव्यये आणि अव्यय प्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | अव्यये | | अव्यय प्रकार |
|---|---|---|---|
| १. | थोडेबहुत | अ. | शब्दयोगी अव्यय |
| २. | पायऱ्यांवर | ब. | उभयान्वयी अव्यय |
| ३. | आणि | क. | क्रियाविशेषण अव्यय |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ब)

**कृ.३. खालील शब्द व विभक्ती प्रत्यय यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| १. | संदर्भाचे | अ. | तृतीया |
| २. | एकमेकांना | ब. | षष्ठी |
| ३. | संवादात | क. | चतुर्थी |
| ४. | माझ्याशी | ड. | सप्तमी |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - ड), (४ - अ)

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. भेटीगाठी २. थोडेबहुत ३. आठवडे

**उत्तर:**

| समास | विग्रह | प्रकार |
|---|---|---|
| भेटीगाठी | भेटी, गाठी वगैरे | समाहार द्वंद्व समास |
| थोडेबहुत | थोडे किंवा बहुत | वैकल्पिक द्वंद्व समास |
| आठवडे | आठ दिवसांचा समूह | द्विगू समास |

**कृ.५. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. माझ्या पोषाखावरुन माझे भारतियत्व त्याने ओळखले असावे.

**उत्तर:** माझ्या **पोषाखावरून** माझे **भारतीयत्व** त्याने ओळखले असावे.

२. क्षणीक परिचयाचे व जवळीकीचे काही हृदय अनुभव देखील आले.

**उत्तर:** **क्षणिक** परिचयाचे व जवळिकीचे काही **हृद्य** अनुभव देखील आले.

**कृ.६. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. गप्पा तर अधिकच सुंदर होत्या. **(उद्‌गारार्थी करा.)**

**उत्तर:** किती सुंदर होत्या गप्पा !!

२. ती जुजबी ओळख असते. **(प्रश्नार्थक करा.)**

**उत्तर:** ती ओळख जुजबी नसते का?

**ड. माझे मत**

**कृ.१. तुम्हाला नवीन लोकांची ओळख करून घ्यायला आवडते का? ती तुम्ही कशी करून घेता?**

**उत्तर:** हो, मला नवीन लोकांची ओळख करून घ्यायला खूप आवडते. मी नेहमी नवनवीन माणसांच्या म्हणजेच मित्रांच्या शोधात असतो. मला आठवतो तो आठवी इयत्तेतला पहिला दिवस. बरीच मुले नवीन होती. बाईंनी सांगितले होते, की आपल्या वर्गातल्या सर्वांची एकमेकांशी छान मैत्री असायला हवी. त्यामुळे आपला वर्ग शाळेची वर्गासाठी असलेली सगळी बक्षिसे मिळवेल.

मी सर्व मुलांची ओळख करून घेतली; पण एक संदीप नावाचा मुलगा मात्र माझ्याशी बोलायला तयार होईना. तो कोणातही मिसळत नसे. कोणाशी खेळत नसे. मी एकदा मधल्या सुट्टीत त्याला याचे कारण विचारले, तर तो म्हणाला. "मी तुझ्याइतका श्रीमंत नाही. माझे कपडेही जुने असतात. मग तुम्ही मुले मला तुमच्यात कसे घ्याल?" त्यावर मी त्याला समजावले, की गरिबी व श्रीमंती हा भेदभाव मैत्रीत कधीही करू नये. आजपासून आपण दोघे चांगले मित्र आहोत. तुला कोणत्याही प्रकारची मदत लागली, तर मला सांग आणि तेव्हापासून संदीप माझा चांगला मित्र झाला.

## परिच्छेद ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५ वरील (ओळ ४९ ते ६२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[परदेशातली अशी आणखी .....................**
**..................... मनात अढी राहून गेली ती गेलीच.]**

### अ. आकलन

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**

| |
|---|
| **लेखिकेला अमेरिकेत सुपरमार्केटमध्ये एक तरुणी भेटली.** |
| ↓ |
| १ |
| ↓ |
| **लेखिकेने तिच्या बाळाचे कौतुक केले.** |
| ↓ |
| २ |
| ↓ |
| **घटकाभर दोघींच्या खूप गप्पा रंगल्या.** |

**उत्तर:** १. लेखिकेला त्या तरुणीचे बाळ खूपच आवडले.
२. त्यावर ती आई एकदम प्रसन्न झाली.

**कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.**

| |
|---|
| **दोन अबोल माणसे एकत्र आली की काही वेळा अचानक असे घडते** |
| ↓ |
| १ |
| ↓ |
| २ |
| ↓ |
| ३ |

**उत्तर:** १. एखादा प्रिय विषय निघतो.
२. दोघांच्या मनाच्या तारा जुळतात.
३. दोघे एकदम भरभरून बोलू लागतात.

**कृ.३. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. मग घटकाभर आम्हा दोघींच्या ________ खूप रंगल्या.
(भेटी / आठवणी / कथा / गप्पा)

२. एकदम ________ बटणावर हात पडावा आणि क्षणार्धात लख्ख प्रकाशाने ती खोली उजळून निघावी तसे झाले.
(काचेच्या / दिव्याच्या / ट्यूबलाईटच्या / बल्बच्या)

**उत्तर:** १. गप्पा २. दिव्याच्या

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. बाबागाडीतली मुलगी इतकी गोड होती, की ________.
अ. तिच्याशी बोलल्याविना मला राहवेना.
ब. तिचे कौतुक केल्यावाचून मला राहवेना.
क. तिच्याशी संवाद साधल्याशिवाय मला राहवेना.
ड. तिला बघितल्याशिवाय मला राहवेना.

२. त्या कविता चढाओढीने एकमेकांना ऐकवताना ________ .
अ. वेळ कसा गेला कळलंच नाही.
ब. दिवस कसा गेला कळलंच नाही.
क. ते तीन तास कसे गेले कळलेही नाही.
ड. ते चार तास कसे गेले कळलेच नाही.

**उत्तर:** १. बाबागाडीतली मुलगी इतकी गोड होती, की **तिचे कौतुक केल्यावाचून मला राहवेना.**
२. त्या कविता चढाओढीने एकमेकांना ऐकवताना **ते तीन तास कसे गेले कळलेही नाही.**

**कृ.५. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**१. दोन अबोल माणसे कधी भरभरून बोलू लागतात?**

**उत्तर:** जेव्हा दोघांनाही प्रिय असलेला एखादा विषय निघतो, दोघांच्या मनाच्या तारा जुळतात, तेव्हा दोन अबोल माणसे भरभरून बोलू लागतात.

**२. सहपरीक्षकांशी बोलताना कवी यशवंतांच्या कवितेचा संदर्भ निघाल्यावर लेखिकेला कसे वाटले?**

**उत्तर:** सहपरीक्षकांशी बोलताना कवी यशवंताच्या कवितेचा संदर्भ निघाल्यावर काळोखाने भरलेल्या खोलीत एकदम दिव्याच्या बटणावर हात पडावा आणि लख्ख प्रकाशाने खोली उजळून निघावी तसे लेखिकेला वाटले.

**कृ.६. आवड जुळल्यास संवादातील अडथळा दूर होतो हे सांगण्यासाठी लेखिकेने कोणते उदाहरण दिले आहे?**

**उत्तर:** कधीकधी दोन अबोल माणसे एकमेकांच्या सहवासात येतात आणि अचानक दोघांनाही प्रिय असलेला एखादा विषय निघतो. दोघांच्या मनाच्या तारा जुळतात आणि आपला अबोलपणा सोडून दोघे एकदम भरभरून बोलू लागतात. याबाबतीत, लेखिका पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेला परीक्षक म्हणून गेली असतानाचा अनुभव सांगते. परीक्षेच्या हॉलमध्ये त्यांच्यासोबत परीक्षक म्हणून आणखी एक प्राध्यापक होते. त्यांचा एकमेकांशी परिचयही नव्हता. त्यामुळे तीन तास पेपर लिहिणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांसमोर शांतपणे बसून राहणे म्हणजे एक प्रकारची शिक्षाच होती, असे लेखिकेला वाटू लागले. मग हळूहळू औपचारिक बोलता बोलता अचानक कवी यशवंतांच्या एका कवितेचा संदर्भ आला. त्याबरोबर दोघांनाही बोलण्याचा समान धागा सापडला. दोघेही कवी यशवंतांचे व सर्वच रविकिरणमंडळाच्या कवितांचे चाहते निघाले. त्यांचे भरपूर संभाषण झाले. कवितेवर मनसोक्त गप्पा झाल्या.

वरील उदाहरणातून मने जुळली, तर संवादातील अडथळे दूर होतात हे लेखिकेने सांगितले आहे.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. पुढे काही शब्द आहेत. त्या शब्दांचे योग्य अर्थ चौकटीतील शब्दांमधून शोधून लिहा.**

१. भोक्ता : ☐
२. मुखोद्‌गत : ☐
३. गोड : ☐
४. गर्क : ☐

| | | |
|---|---|---|
| लख्ख | | मंद |
| मग्न | चाहता | भोगणारे |
| तोंडपाठ | | मधुर |

**उत्तर:** १. चाहता २. तोंडपाठ
३. मधुर ४. मग्न

**कृ.२. पुढे शब्द दिले आहेत. त्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द चौकटीतील शब्दांमधून शोधून लिहा.**

१. अबोल × ☐
२. कौतुक × ☐
३. काळोख × ☐
४. उदास × ☐

| | | |
|---|---|---|
| प्रसन्न | | प्रकाश |
| अपयश | बोलका | |
| निंदा | | संदर्भ |

**उत्तर:** १. बोलका २. निंदा
३. प्रकाश ४. प्रसन्न

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. आई, बाळ, परीक्षक, मुलगी
२. भेट, कविता, सहवास, परिचय

**उत्तर:** १. परीक्षक २. कविता

**कृ.४. कंसात दिलेले वाक्प्रचार खाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा. (गर्क होणे, तारा जुळणे, मुकाट बसून राहणे)**

१. अनिल अवचटांचे व्याख्यान ऐकण्यात सर्व मुलं मग्न झाली होती.
२. वाचनाच्या आवडीमुळे सुधीर आणि रवीचे विचार लगेच जुळले.
३. दादा आणि त्याच्या मित्रांच्या गप्पांमधले विषय एवढे अवघड होते, की मी त्यांच्याशेजारी शांत बसून राहिलो.

**उत्तर:** १. अनिल अवचटांचे व्याख्यान ऐकण्यात सर्व मुलं **गर्क झाली होती.**
२. वाचनाच्या आवडीमुळे सुधीर आणि रवीच्या **तारा लगेच जुळल्या.**
३. दादा आणि त्याच्या मित्रांच्या गप्पांमधले विषय एवढे अवघड होते, की मी त्यांच्याशेजारी **मुकाट बसून राहिलो.**

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दापासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. प्रकाश : ☐
२. मुख्य : ☐

**उत्तर:** १. प्रकाशकिरण, प्रकाशवर्ष
२. मुखोद्‌गत, मुखशुद्धी

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्द व त्यांच्या जाती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | परदेश | अ. | क्रियापद |
| २. | हुशार | ब. | सर्वनाम |
| ३. | मला | क. | नाम |
| ४. | आठवते | ड. | विशेषण |

**उत्तर:** (१ - क), (२ - ड), (३ - ब), (४ - अ)

**कृ.२. वाक्यातील अव्यय ओळखून त्याचा प्रकार लिहा.**
कधीकधी दोन अबोल माणसे एकमेकांच्या सहवासात येतात.

**उत्तर:** कधीकधी – क्रियाविशेषण अव्यय

**कृ.३. परिच्छेदातील षष्ठी व सप्तमी विभक्तीचे शब्द शोधून लिहा.**

**उत्तर:** **षष्ठी विभक्ती :**
१. कवितेचा २. दिव्याच्या
**सप्तमी विभक्ती :**
१. सहवासात २. खोलीत

**कृ.४. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. चूळबूळत | चुळबूळत | चूळबुळत | चुळबुळत

२. दोघिंनाही | दोघींनाही | दोघिंनाहि | दोघींनाहि

**उत्तर:** १. चुळबुळत २. दोघींनाही

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. किती गोंडस बाळ आहे तुमचं! **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** तुमचं बाळ गोंडस आहे.

२. दोघांनाही अनेक कविता मुखोद्‌गत होत्या. **(उद्‌गारार्थी करा.)**

**उत्तर:** किती कविता मुखोद्‌गत होत्या दोघांना!

**ड. माझे मत**

**कृ.१. शब्दांचे जीवनातील महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर:** भाषा हे लोकव्यवहाराचे एक सुगम आणि सर्वश्रेष्ठ साधन आहे. शब्द हा भाषेचा मूलभूत घटक होय. शब्दांमध्ये खूप मोठे सामर्थ्य असते. शब्दांमुळे अर्थबोध होतो. वेदांमध्येही शब्दांची महती व्यासांनी वर्णिली आहे. उपनिषदांत शब्द हे ब्रह्म मानले आहे. खरेतर शब्द हा ध्वनीचा किंवा वर्णांचा समूह असून, तो कोणतातरी भाव व विचार व्यक्त करण्यासाठी उच्चारला जातो. शब्दांत मोठी ताकद असते. शब्दांत वेगवेगळे भाव लपलेले असतात. शब्दांचा वापर शस्त्र म्हणून होतो. अस्त्र म्हणूनही होतो. शब्दांमुळे दोन मने जुळतात व तुटतातही. शब्द आपापसांतील प्रेम फुलवू शकतात. त्यासाठी शब्दांच्या वाती पेटायला हव्यात.

शब्दच आपल्याला ज्ञानाच्या अनेक शाखांचे दरवाजे उघडून देऊन त्यातील गूढ ज्ञानाचा लाभ करून देतात. शब्दांतून वेगवेगळ्या भावना प्रकट होतात. कधी शब्दांमुळे एखाद्या कृतीचे, गोष्टीचे, घडलेल्या प्रसंगाचे, इतिहासाचे ज्ञान होते, तर कधी शब्दांच्या माध्यमातून मने जिंकली जातात. शब्दांत रण माजवण्याचे सामर्थ्य असते व शांतता निर्माण करण्याची विशाल शक्ती असते; म्हणूनच शब्दांचे जीवनातील महत्त्व अनन्यसाधारण असते.

## सारांश लेखन

**'संवाद, विसंवाद' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

प्रस्तुत पाठात लेखिका शांता शेळके यांनी संवादाच्या विविध प्रकारांचे व त्यातील अडथळ्यांचे वर्णन केले आहे. एकमेकांशी एक शब्दही न बोलता एकमेकांबरोबर संवाद साधणे ही संवादाची परमोच्च आदर्शावस्था असते. अनेक विद्वान व्यक्ती, गुरूशिष्य, जिवलग व्यक्ती या अवस्थेप्रत पोहोचलेल्या दिसतात; पण सामान्यजनांना मात्र संवादाची गरज भासते. त्यातही संवादाची, बोलण्याची पद्धत व्यक्तीनुसार बदलते. आपल्या जवळच्या व्यक्तींशी, मित्रमैत्रिणींशी संवाद साधताना कित्येकदा आपण एकमेकांची मने, स्वाभिमानची ठिकाणे सांभाळण्याच्या, मतभेद टाळण्याच्या नादात संवादातील मोकळेपणा गमावून बसतो, तर कधी अगदी जवळच्या व्यक्तीबरोबर संवाद साधताना क्षुल्लक गोष्टींवरून गैरसमज होतात. याउलट फारशी ओळख नसलेल्या, प्रवासात, परदेशात तात्पुरत्या भेटलेल्या लोकांशी मनमोकळ्या आणी सुंदर गप्पा होतात. काही वेळा दोन अबोल माणसेही त्यांना प्रिय असणारा विषय निघाल्यास, मने जुळल्यास, भरभरून बोलू लागतात.

विविध व्यक्तींमधील संवादाचे पैलू लेखिकेने ओघवत्या शैलीत वर्णिले आहेत.